Vol 6 Issue 11 Dec 2016

ISSN No : 2230-7850

## International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# समता सैनिक दलाचे आंबेडकरी चळवळीतील योगदान. (1927 ते 1956)

श्री. प्रेमराज बारीकराव खोब्रागडे
सहाय्यक शिक्षक जिल्हा परिषद हायस्कूल सिंदेवाही.

## प्रस्तावना

वर्षानुवर्षापासून तोंड असून मुके, डोळे असून आंधळे, पाय असून लंगडे, कान असून बहिरे अशा सर्वार्थाने शोषित असणाऱ्या वर्गाला साधे मानवीय अधिकार मिळवून देण्यासाठी जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक व राजकीय आंदोलने उभी करून समतेचा लढा सुरू केला, त्यावेळी संपूर्ण हिंदू समाज व्यवस्थेष ला एक प्रचंड हादरा बसला. कारण यामुळे चातुर्वर्ण्य नावाची ही बिना शिडीची चार मजली इमारत हलायला लागलेली होती. अशावेळी हा व्यक्ती आमच्या धर्मावरती आक्रमण करायला निघालेला आहे, असे वातावरण प्रस्थापित वर्गाने तयार केले. त्यामुळे डॉ. आंबेडकरांना तसेच अस्पृश्य समाजाला प्रचंड धमक्या यायला लागल्या. विरोधी वातावरण तयार केल्या गेले. चळवळीला धोका निर्माण झाला. चळवळ चालवित असतांना तिला अपेक्षित यशापर्यंत न्यायचे असेल तर आपणच आपले व आपल्या चळवळीचे संरक्षण केले पाहिजे, याच विचारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'समता सैनिक दलाची' स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या विश्वासाला खरे उतरत अगदी सामान्यांपासून असामान्यांपर्यंत 'समता सैनिक दलाच्या' लढवैया 'भीमसैनिकांनी' स्वतःच्या प्राणाची आहुती देत–देत, समाजाला व समाजाला जागृत करणाऱ्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हयातभर संरक्षण पुरविले. 'समता सैनिक दल' हे 'आंबेडकरी चळवळ' या चकचकित दिसणाऱ्या इमारतीच्या पायातील दगड आहे. म्हणूनच या संघटनेला न्याय देता यावा व 'समता सैनिक दलाचा' खरा इतिहास पुढील पिढीसमार यावा. याच प्रामाणिक हेतुने 'समता सैनिक दलाच्या' कार्याचा आढावा या शोधनिबंधात घेतलेला आहे.



## प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश :–

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या 'समता सैनिक दलाच्या' 1927 ते 1956 पर्यंतच्या समता सैनिक दलाच्या आंबेडकरी चळवळीतील कार्याचा अभ्यास करणे.

## समता सैनिक दलाचे आंबेडकरी चळवळीतील योगदान (1927 ते 1956) :–

पूर्वाश्रमीचा अस्पृश्य व आजच्या बौद्ध समाजाकडे पाहिले की, या समाजाने अगदी अल्पावधित सर्वच आघाड्यांवर केलेली उन्नती पाहून मन थक्क होते. परंतु ही उन्नती होण्याकरिता बहिष्कृत वा अस्पृश्य समाजातील ज्ञात–अज्ञात अशा अनेक स्वयंसेवकांनी कित्येक वर्षापासून प्रयत्न चालविलेले होते. गावा–गावांतून, वाड्या–वस्त्यांमधून, जिल्ह्या–जिल्ह्यातून फिरून जागृती केलेली आहे. ही जागृती करीत असतांना उच्चवर्णियांकडून तसेच स्वकीयांकडूनही छळ सहन केलेला आहे. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक, मानसिक व आर्थिक उत्थानासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जी आंदोलने वा चळवळ चालवित होते, तीच चळवळ 'आंबेडकरी चळवळ' म्हणून ओळखली जाते. या चळवळीच्या यशस्वीतेसाठी स्वयंसेवक दल, जे की 'समता सैनिक दल' म्हणून ओळखल्या जाते, या दलाने 'आंबेडकरी चळवळीला' वा नेत्याला फक्त संरक्षणच दिले नाही, तर या चळवळीला खऱ्या अर्थाने गतीमान केले. चळवळीला बळ प्राप्त करून दिले. दलाच्या प्रत्येक सैनिकांनी रांत्रदिवस समाजाच्या उन्नतीचाच विचार केला. स्वतःच्या परिवारापेक्षा 'माझा समाज' हीच भावना त्यांच्या अंगप्रत्यंगात रुजलेली होती. हे सगळे करीत असतांना ते स्वतः निर्धन असूनही त्यांनी कधी धनाची, लोभाची वा लाभाच्या पदाचीही अपेक्षा केलेली नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1927 ला 'समता सैनिक दलाची' स्थापना केली.[1] हे स्वयंसेवक पथक महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या पार्श्वभूमीवर महाड येथे चोख व्यवस्था ठेवण्यासाठी प्रथमतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चाळीतील लोकांनी उभारले.[2] सुरुवातीला स्वयंसेवकांची संख्या फक्त 15 होती. त्यांना सावंत नावाचा तरुण प्रशिक्षण देत असे. त्यानंतर त्यांची संख्या वाढत गेली. पुढे त्यांनी आपापल्या भागातील गटांचे पदाधिकारी नेमले.[3] सुरूवातीला हे दल 'डॉ. आंबेडकर सेवा दल, डॉ. आंबेडकर पथक, स्वयंसेवक दल, तरुण महार संघ, व्हालेंटिअर्स, बहिष्कृत हितकारिणी सभेचे स्वयंसेवक, स्कॉऊट–गाईड' अशा विविध ठिकाणी, विविध नावाने ओळखल्या जायचे. परंतु कालांतराने त्यास 'समता सैनिक दल' हे नाव डॉ. आंबेडकरांनी स्वतः दिले.[4] पुढे त्यासच 'अखिल भारतीय समता सैनिक दल'[5] (Social Equality Force) हे नामाभिदान प्राप्त झाले. यात सुरुवातीला मिलिटरीतील पेंशनर्स लोकांचाच मोठ्या प्रमाणात भरणा होता. किंबहुना समता सैनिक दलाची स्थापना करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचेशीच सल्लामसलतही केलेली होती. समता सैनिक दल ही समाजामध्ये संघटित स्वयंसेवकांची काम करणारी सांस्कृतिक संस्था होती.[6] या संघटनेत कार्य करणाऱ्या व्यक्तिंना काही आचार संहिता असावी म्हणून समता सैनिक दलाची स्वतंत्रपणे घटना तयार करण्यात आली. ज्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः 1945 ला मान्यता दिली. ती घटना 1946 ला प्रकाशित करण्यात आली.[7]

खऱ्या अर्थाने स्वयंसेवक दलाच्या म्हणजे 'समता सैनिक दलाच्या'

कार्यकर्त्यांच्या कार्य आणि कर्तृत्त्वाला धार आली ती, महाडच्या संग्रामानंतर! ज्या महाड क्रांतिपर्वाच्या पार्श्वभूमीवर समता सैनिक दल अस्तित्त्वात आले. ते क्रांतिपर्वच मानवी हक्कांकरिता होते. महाड सत्याग्रहाच्या स्मृतिप्रित्यर्थ चवदार तळ्यावर उभारण्यात आलेल्या डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेच्या स्तंभावर नमूद करण्यात आले आहे की, "हा संघर्ष केवळ पाण्याकरिता नसून मूलभूत मानवी हक्कांकरिता आहे."[8]

***नाशिक येथील श्री काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहात समता सैनिक दलाचे योगदान :–*** महाडच्या धर्मसंगरानंतर नाशिक येथे मंदिर प्रवेश सत्याग्रह सुरू केला. या सत्याग्रहास प्रत्यक्षात 2 मार्च 1930 ला सुरुवात झालेली दिसत असली तरी त्याची पूर्वतयारी पुणे येथील पार्वती सत्याग्रहाचे दरम्यानच्या काळातच सुरू केलेली दिसून येते. या सत्याग्रहासाठी एक हजार स्वयंसेवकांनी नावे नोंदविली असल्याचे नाशिकच्या जिल्हा पोलीस अधिक्षकाने 1 फेब्रुवारी 1930 ला सरकारला कळविलेल्या अहवालातून स्पष्ट दिसून येते.[9] या सत्याग्रहासाठी हजारो लोकांचे थवेच्या थवे नाशिक येथे येत होते. नाशिक सत्याग्रहाबाबतचा अहवाल आयुक्त श्री. घोषाळ यांनी गृहमंत्री मि. अर्नेस्ट यांना पाठविला त्यात ते लिहितात की, "खाकी पोषाख केलेले आणि हातात काठ्या घेतलेले लोक पहारा देत होते. सत्याग्रहींचा वेष खादीचा होता."[10] सत्याग्रहाचे स्वरूप पूर्णपणे शांतता व शिस्तीवर आधारलेले असले तरी 'शक्य असेल तोवर अहिंसा, जरुर पडेल तर हिंसा, असे धोरण सत्याग्रही माणसांनी ठेवणे हे सिद्धीच्या दृष्टिने रास्त आहे. इतकेच नव्हें तर नीतीच्या दृष्टिनेही ते प्रशस्त आहे,' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेहमी सांगत असत. रामनवमीच्या दिवशी ता. 9 एप्रिलला रामनवमीला निघणाऱ्या रथयात्रेच्या मिरवणुकीच्या वेळी प्रचंड दगडांचा वर्षाव सुरू असतांना डॉ. आंबेडकरांचे दगडांच्या वर्षावापासून संरक्षण करण्यासाठी स्वयंसेवक दलाचे कार्यकर्ते डॉ. आंबेडकरांवर छत्री धरून त्यांचे दगडांपासून संरक्षण करीत होते. या दंगलीत अनेक स्पृश्य–अस्पृश्य, स्त्रिया तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकरही जखमी झालेत. या भयंकर परिस्थितीत समता सैनिक दलाच्या स्वयंसेवकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सुरक्षित स्थळी हलविले. हा सत्याग्रह जवळपास 1934 पर्यंत म्हणजे चार ते पाच वर्षे चालला. या दरम्यान अनेक सत्याग्रहींना जखमा झाल्या. सत्याग्रहींना जमिनीवर पाडून मन मानेल तसे लाथा– बुक्यांनी, वहाना–बुटांनी व लाठ्या–काठ्यांनी बेदम मारहाण केली. हे सर्व करण्यामागे त्यांचा उद्देश, सत्याग्रही चवताळून कायदा हातात घेतील व मारहाणीस प्रवृत्त होतील हा होता. परंतु सत्याग्रही स्वयंसेवकांनी आपली शिस्त व शांतता ढळू दिली नाही.[11] या सत्याग्रहाच्या वेळी अनेकांना तुरुंगवास झाला. त्यात पुरुष स्वयंसेवकांसोबत महिलासुद्धा होत्या. या सत्याग्रहात समता सैनिक दलाच्या स्वयंसेवकांनी अभूतपूर्व अशी कामगिरी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा या सत्याग्रहामागील मूळ उद्देश सफल होईल अशी वाटचाल करून हा सत्याग्रह यशस्वी करून दाखविला. कारण या सत्याग्रहामागचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मूळ उद्देश होता की, अस्पृश्यांमध्ये हजारो वर्षांपासूनचा मेलेला स्वाभिमान जागृत करणे आणि त्यासाठी लढा द्यावयास शिकविणे. या लढ्यातूनच भविष्यातील क्रांतिची बीजे पेरल्या गेली.

***गोलमेज परिषदेच्या काळातील समता सैनिक दलाचे कार्य :–*** डॉ बाबासाहेब आंबेडकरांची निवड जेव्हा पहिल्या गोलमेज परिषदेसाठी अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून झाली; तेव्हा हा प्रसंग अस्पृश्यांसाठी फारच आनंददायक असा होता. या परिषदेमध्ये डॉ. आंबेडकरांनी आपल्या विद्वत्तापूर्ण भाषणांमुळे सर्वांची मने जिंकून घेतलेली होती. परंतु दुसऱ्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांच्या हक्कांच्या संदर्भात म. गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात संघर्ष निर्माण झाला. परिणामी भारतातील वर्तमानपत्रांनी डॉ. आंबेडकरांच्या भूमिकेची यथार्थ छाननी न करता डॉ. आंबेडकर हे गांधीजींचे शत्रू असून ते राष्ट्रविरोधी भूमिका घेतात, अशा प्रकारच्या बातम्या छापून या आगीत तेलच ओतण्याचे काम केले. ब्रिटिशांचा बगलबच्चा, गवतातला साप, देशद्रोही, भीमासूर, चार्वाक, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संभावना सभातून, वृत्तपत्रातून काँग्रेस कार्यकर्त्यांनी केलेली होती.[12] त्यामुळे अस्पृश्य समाजाचे विरोधात सर्व वातावरण तयार झाले. तेव्हा समता सैनिक दलाचे स्वयंसेवक, अस्पृश्यांचे पुढारी, कार्यकर्ते यांनी सर्व शक्ती पणाला लावून 'डॉ. आंबेडकर हेच आमचे नेते आहेत' अशा आशयाच्या शेकडो तारा इंग्लंडमध्ये पाठविल्या.[13] त्यासाठी प्रचंड जनजागृती केली. ठिकठिकाणी शेकडो सभा घेण्यात आल्या.[14]

***स्वतंत्र मजूर पक्षाने लढविलेल्या 1937 च्या निवडणुकांमध्ये समता सैनिक दलाचे कार्य :–*** 1935 चा भारतीय कायदा अस्तित्वात आल्यानंतर त्या कायद्याचे अनुषंगाने, ज्या विविध राजकीय घडामोडी घडून आल्या, त्या भारतीय राजकारण आणि अस्पृश्यांच्या जीवनात बऱ्याच परिवर्तनास कारणीभूत ठरल्या. हा कायदा लागू झाल्यानंतर या कायद्याद्वारे प्रांतांना स्वायत्तता मिळाली. आता निवडणुका अटळ आहेत याची जाणीव सर्वांनाच झाली. ह्या निवडणुका जानेवारी 1937 च्या आसपास होण्याची चिन्हे दिसू लागली. यांस डॉ. बाबासाहेब आंबेडकरही अपवाद नव्हते, किंबहुना ते याच संधीच्या शोधात होते. सर्वांनी आपापल्या पक्षांची मोर्चेबांधणी सुरू केली, तशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही करणे सुरू केली. त्यासाठी अखिल भारतीय स्वरूपाचा राजकीय पक्ष काढण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठरविले. त्यानुसार त्यांनी पक्षाची घटना, ध्येये, उद्दिष्ट्ये ठरविली, तीसुद्धा इंग्लंडमधील ब्रिटिश लेबर पार्टीचा आदर्श पुढे ठेवून.[15] त्यांनी स्थापन केलेल्या पक्षाचे नाव 'स्वतंत्र मजूर पक्ष' ;प्दकमचमदकमदज स्इवनत च्तजलद्ध असे ठेवले. या पक्षाची स्थापना ता. 15 ऑगस्ट 1936 रोजी करून जाहीरनामा प्रसिद्ध केला. नव्याने स्थापन केलेल्या पक्षाचे महत्त्व आणि व्याप्ती वाढविण्यासाठी त्यांनी प्रचारमोहीम सुरू केली. डॉ. आंबेडकरांचे मनोगत आणि संदेश शेवटच्या घटकांपर्यंत पोहचावे म्हणून समता सैनिक दलाचे स्वयंसेवक घरोघरी जाऊन निवडणुकीचा प्रचार करीत होते. डॉ. आंबेडकर म्हणायचे, 'तुम्ही आपली भाकरी पाठिशी बांधून मतदानासाठी पोलिंग बूथवर गेले पाहिजे.[16] हा संदेश समता सैनिक दलाचे स्वयंसेवक लोकांपर्यत नेत होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांच्या हक्क आणि अस्तित्त्वासाठी 1937 च्या निवडणुकीच्या रणसंग्रामात उतरले. ही निवडणूक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या राजकीय हक्काचे प्रवेशद्वार समजून लढविली. अशावेळी समाजाला व समता सैनिक दलाला आवाहन करताच समता सैनिक दलाने आपल्या शिस्त, संघटन व एकीच्या बळावर स्वतंत्र मजूर पक्षाला हा विजय संपादन करून दिला व आपल्या स्वार्थत्यागाने आंबेडकरी चळवळीत आपले अभूतपूर्व स्थान निर्माण केले. या निवडणुकीत स्वतंत्र मजूर पक्षाला अशाप्रकारे मुंबई आणि वऱ्हाड–मध्यप्रांत मिळून एकूण एकेवीस जागा मिळाल्या. या विजयाला डॉ. आंबेडकर, 'मगराच्या मगरमिठीतून आणलेला दिव्य मणी आहे.'[17] अशी उपमा देतात.

***नागपूर येथील 1942 ची परिषद व समता सैनिक दलाची भूमिका :–*** हे अधिवेशन नागपूर येथे ता. 18, 19 व 20 जुलै 1942 असे तीन दिवस घ्यायचे ठरले. ह्या अधिवेशनात 1) ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस कॉन्फरन्स– 18 व 19 जुलै 1942. 2) ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वुमेंस कॉन्फरन्स– 20 जुलै 1942. 3) समता सैनिक दल कॉन्फरन्स– 20 जुलै 1942. अशा तीन परिषदा घेण्यात आल्या. या तीन्ही परिषदांचे आयोजन करणे, वाटते तितके सोपे काम नव्हते. परंतु हे आव्हान आणि कार्य नागपूरच्या जनतेने व समता सैनिक दलाने सहर्ष स्वीकारले. यावेळी स्वतंत्र मजूर पक्ष व समता सैनिक दल एकत्रित काम करायचे. त्यामुळे जेथे जेथे स्वतंत्र मजूर पक्ष आहे, तेथे तेथे समता सैनिक दल आहे, हे गृहीत होते. या परिषदेसाठी संपूर्ण भारतातील प्रतिनिधी आलेले होते. समता सैनिक दलाचे सुमारे 5000 सैनिक गणवेषामध्ये मोठ्या शिस्तीने उभे राहिले होते. या परिषदेसभोवती तीनही दिवस समता सैनिक दलाचा जागता पहारा होता. संपूर्ण व्यवस्था दलाच्या स्वयंसेवकांनी सांभाळली होती. या परिषदेसाठी वीस हजार स्त्रियांसह पाऊण लाख लोक उपस्थित होते. एवढ्या मोठ्या लोकांची सुरक्षा करण्यापासून तर त्यांच्या राहण्या आणि जेवनाची गैरसोय होऊ नये याची काळजी सैनिक घेत होते. ता. 20 जुलै

1942 ला दु. 12:30 वा. 'अखिल भारतीय समता सैनिक दलाचे अधिवेशन घेण्यात आले. याप्रसंगी परिषदेचे अध्यक्ष सरदार गोपाल सिंग म्हणाले की, "... भाषण संपविण्यापूर्वी मला समता सैनिक दलाच्या संचालकांचे आभार मानने आवश्यक आहे. ह्या लाल डगलेवाल्यांनी जे अभूतपूर्व कार्य केलेले आहे, त्यामुळे अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेला आपले कार्य पार पाडण्यात अपूर्व यश मिळाले.[18] याच अधिवेशनात समता सैनिक दलाच्या घटना तपासून अखिल भारतीय समता सैनिक दलास पोषक होईल अशी घटना तयार करावी असा ठराव पास करण्यात आला. त्यासाठी 5 सदस्यांची घटना समिती तयार करण्यात आली. हे अधिवेशन फार मोठ्या प्रमाणात यशस्वी करण्याचे श्रेय समता सैनिक दलाला आहे, हे सर्वानी मान्य केले व समता सैनिक दलाची ताकद दिवसेंदिवस वाढविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे, यावर सर्वांचे एकमत झाले.

***समता सैनिक दलाचे दुसरे अधिवेशन :–*** अखिल भारतीय समता सैनिक दलाचे दुसरे अधिवेशन रविवार, ता. 30 जानेवारी, 1944 रोजी उत्तर प्रदेशमध्ये कानपूर येथे सकाळी भरले. या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. भाऊराव गायकवाड होते. तर प्रमुख अतिथी म्हणून ना. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशनचे अध्यक्ष श्री. एन. शिवराज, जनरल सेक्रेटरी पी. एन. राजभोज, प्यारेलाल कुरील तलीब इत्यादी लोक होते. यांची अधिवेशनात भाषणे झाली. या अधिवेशनासाठी मुंबई, मध्यप्रांत, गुजरात, पंजाब, बंगाल, मद्रास, संयुक्तप्रांत, हैद्राबाद, ग्वाल्हेर, कोल्हापूर, इंदूर, उज्जैन वगैरे संस्थांनातून शेकडो प्रतिनिधी आले होते. प्रथम श्री. आर. आर. पाटील (नागपूर) यांनी मुंबई व नागपूर येथील समता सैनिक दलांनी गेल्या वर्षात केलेल्या कामगिरीचा अहवाल वाचून दाखविला. त्यानंतर अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. भाऊराव गायकवाड यांचे भाषण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता सैनिक दलाच्या गौरवशाली परंपरेच्या इतिहासाला उजाळा देत त्यांच्यावर विश्वास दाखविला. मुंबई व नागपूरमध्ये (मध्यप्रांत–वऱ्हाड) समता सैनिक दलाचे 10,000 सैनिक आहेत हे अभिमानाने सांगत, दलाच्या कार्यकर्त्यांना दलाच्या शाखा प्रांतोप्रांती, शहरोशहरी, खेडोपाडी स्थापून शक्ती वाढविण्याचे आवाहन केले. प्यारेलाल कुरील तलीब यांनी, 'आपल्या संयुक्त प्रांतात येत्या अधिवेशनापूर्वी दहा हजारावर सैनिक तयार करून ठेवितो,' असे सांगितले.[19] यात बोलतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "समता सैनिक दल हे आपल्या राजकीय पार्टीचे सामर्थ्य आहे. लढणाऱ्या सैनिकांशिवाय कोणतीही पार्टी सामर्थ्यवान होणार नाही. आपल्याला तर मोठमोठ्या संस्थांशी टक्कर द्यावयाची आहे. म्हणून आपण समता सैनिक दल वाढविले पाहिजे..."[20] हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी संपूर्ण भारतातील समता सैनिक दलाने अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली होती. अधिवेशन संपताच सर्वजण पुन्हा कार्याला लागले.

***समता सैनिक दलाचे तिसरे अधिवेशन :–*** अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशनचे व समता सैनिक दलाचे तिसरे अधिवेशन ता. 5 व 6 मे, 1945 ला मुंबई येथे अत्यंत उत्साहात भरले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचंड घडामोडी घडत असतांना हिंदुस्थानातील आठ कोटी अस्पृश्य जनतेला काय वाटते, कोणते प्रश्न सर्वात जिव्हाळ्याचे वाटतात व त्या प्रश्नांच्या बाबतीत त्यांचे काय म्हणणे आहे, हे समजण्याच्या दृष्टिने अधिवेशन बोलावण्यात आले होते. अधिवेशनाची प्रवेश फी 1 रुपया ठेवूनही जवळपास दीड लाख अस्पृश्य जनता आलेली होती. मुंबईच्या शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशनच्या व समता सैनिक दलाच्या शेकडो स्वयंसेवकांनी रात्रंदिवस जिवापाड मेहनत करून हे अधिवेशन यशस्वी केले.[21] यानंतर देशात 1945–46 च्या निवडणुका झाल्या. या निवडणुकासंदर्भात डॉ. आंबेडकर समता सैनिक दलास आदेश देतांना म्हणाले की, "समता सैनिक दलातील सैनिकांनी लोकांची काळजी घेतली पाहिजे. हिंदू लोक तर आपल्या विरुद्ध आहेतच, पण सरकारचे पोलीससुद्धा आपल्या विरुद्ध आहेत, तेव्हा आपल्या लोकांना संरक्षण देण्याची कामगिरी समता सैनिक दलाला करावयाची आहे."[22] परंतु या निवडणुकीच्या वेळी सर्व स्पृश्य डॉ. आंबेडकरांच्या विरोधात असल्याने या निवडणुकीमध्ये शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशनचे उमेदवार प्राथमिक निवडणुकीमध्ये निवडून आल्यानंतरही काँग्रेसने सर्व ठिकाणी आपले उमेदवार उभे केले आणि पुणे करारास धक्का मारून हिंदूबहूल मतसंख्येच्या आधारावर ते निवडूनही आणले. 1946 च्या निवडणुका संपल्यानंतर काँग्रेसने आपली प्रांतिक सरकारे एप्रिलमध्ये स्थापन केली. आपल्यावरील झालेल्या अन्यायाचा जाहीर स्फोट करण्यासाठी 15/7/1946 ला पुण्यातील बैठकीवर मोर्चा नेऊन सत्याग्रह करण्याची चळवळ शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशनने हाती घेतली. ठिकठिकाणी 'पुणे कराराचा' धिक्कार करण्यात येऊ लागला. या चळवळीत भाग घेण्यासाठी विविध प्रांतातून लोक आपापल्या खर्चाने व जेवणासाठी शिधा–सामग्री घेऊन आले होते. हा सत्याग्रह आठ दिवस चालला. यावेळी समता सैनिक दलाचे अनेक सैनिकांना तुरुंगात धाडण्यात आले.[23] या सत्याग्रहासंबंधी मुलाखत देतांना डॉ. आंबेडकर समता सैनिक दलाच्या स्वयंसेवकांवर विश्वास दाखवित म्हणाले की, "प्रत्यक्ष रणांगणावर सेनापतीने हजर राहण्याची जरुरी नाही. माझे विश्वासातले लेफ्टनंट या लढ्यासंबंधीची सर्व तजविज करीत आहेत. माझ्या हजेरीची किंवा सत्याग्रहात भाग घेण्याची जरुरी उत्पन्न होईल त्यावेळी मी तेथे हजर होईन..."[24] यावरून समता सैनिक

***म. गांधी यांची हत्त्या व समता सैनिक दलावरील बंदी :–*** ता. 30 जानेवारी 1948 रोजी म. गांधी यांचा खून करण्यात आला व संपूर्ण देशच हादरुन निघाला. या हत्त्येशी दुरान्वयानेही संबंध नसतांना समता सैनिक दलावर बंदी लादण्यात आली होती. या विरोधात आवाज उठविणारांना तुरुंगात टाकण्यात आले.[25] पुढील एक दोन वर्षात समता सैनिक दलावरील बंदीचा परिणाम फार मोठ्या प्रमाणात संघटनात्मक कार्यावर झाला. समता सैनिक दलाच्या कार्यात थोडी शिथिलता आली. परंतु समता सैनिक दलावरील बंदी उठताच पुन्हा दलाने फिनिक्स पक्षाप्रमाणे उंच भरारी घेतली. पुन्हा त्यांचे कार्य संघटनात्मकरित्या जोमाने सुरू झाले. यानंतर 1950 ला भारतीय संविधान लागू करण्यात आले. सर्वांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संविधानाचे शिल्पकार म्हणून तोंडभरून स्तुती केली. याच संविधानाच्या अधिन राहून स्वांतत्र्योत्तर भारतात 1951–52 ला पहिल्या सवार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही या निवडणुकीसाठी शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशनचे उमेदवार उभे करून त्यांना निवडून आणण्याचे आवाहन समाज आणि समता सैनिक दलाला केले. डॉ. आंबेडकरांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत समता सैनिक दलाने कोणत्याही प्रकारची कसूर न करता जीवाचे रान करीत प्रचार केला. प्रत्येक घराघरातील मतदारांपर्यंत पोहचले. परंतु शेवटी मतसंख्येच्या बाबतीत कमी पडले. या निवडणुकीत सर्वातोपरी प्रचार करूनही शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशनला फार अपयश आले. लोकसभेतील पराभवानंतर डॉ. आंबेडकरांनी आपले सारे लक्ष बौद्ध धम्माच्या वाचनावर केंद्रित केले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना राज्यसभेवर निवडण्यात आले.

***धर्मांतराच्या चळवळीमध्ये समता सैनिक दलाचे योगदान :–*** धर्मांतराबाबत कार्यकर्त्यांशी डॉ. आंबेडकरांच्या अनेकदा चर्चा व्हायच्या. अशा बैठकीतील विचारांचे पडसाद दिल्ली, नागपूर, औरंगाबाद वगैरे ठिकाणी उमटले. लगेच विविध कार्यकर्त्यांचे शिष्टमंडळ डॉ. आंबेडकरांना भेटायला जाऊ लागले. नागपूरचेही शिष्टमंडळ यात होते. त्यांनी वामनराव गोडबोले व इतर कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करून ता. 14 आक्टोबर 1956 रोजी नागपूर येथे दीक्षा समारोह करण्याची तारीख निश्चित केली व तसा कार्यक्रमही दिला. सर्व कामाला लागले. सर्वजण एकोप्याने कार्य करू लागले. सर्वांच्या तोंडी एकच वाक्य– "आपण इतिहास बदलण्याचे साक्षी होणार!" एक महत्त्वाचा प्रश्न होता स्वयंसेवकांचा. कारण एवढा मोठा कार्यक्रम करायचा म्हणजे त्यासाठी फार मोठ्या संख्येने स्वखुशीने कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांची गरज होती. स्वयंसेवकांचे कार्य करण्यास सुमारे 500 नावे आलीत. स्वयंसेवकांचे नियोजन करण्याचे कार्य ॲड. के. व्ही. उमरे यांचेकडे सेनापती या नात्याने सोपविले होते. अनेक स्वयंसेवकांनी दीक्षेचे मैदान साफ करण्यापासून तर दीक्षेच्या वेळी

दीक्षार्थिंची योग्य प्रकारे मदत करण्यापर्यंत सर्व कार्ये केली. स्वयंसेवकांकरिता अनेक वस्त्यांमधून इच्छूक नावांच्या याद्या आल्या. याशिवाय मुंबई वगैरे अनेक ठिकाणची समता सैनिक दलाची पथके बंदोबस्तासाठी आलेली होती. यातील अनेकजण उत्फुर्तपणे आलेली होती. धम्मसोहळा हा माझा सोहळा आहे, असे समजून दलाचे सैनिक कार्य करीत होते. अन्नधान्य जमा करण्यापासून तर लोकांना रेल्वेमध्ये बसण्या–उतरवण्यापर्यंत दलाचे स्वयंसेवक मदत करीत होते. नागपूरातील सर्व वस्त्यातील 5000 स्वयंसेवक व समता सैनिक दलाचे कार्यकर्ते पूर्णव्यवस्थेसह रात्रंदिवस राबत होते.[26] डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या होटलमध्ये राहणार होते. त्या होटल सभोवती संरक्षणाचे कडे करून समता सैनिक दलाचे स्वयंसेवकांचा जागता पहारा होता. ता. 14 आक्टोबर 1956 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माईसाहेब आंबेडकर यांना सकाळी 10 ते 11 चे दरम्यान भन्ते महाथेरो चंद्रमणी यांचे हस्ते दीक्षा देण्यात आली. या दीक्षा सोहळ्यासाठी जवळपास 5 ते 6 लाख लोकांचा जनसमुदाय सांभाळणे वाटते तितके सोपे काम नव्हते. यासाठी मध्यप्रदेश सरकारने फक्त 500 पोलिसांची सोय केलेली होती. ती अपुरी असल्याने या दीक्षा सोहळ्याची खास व्यवस्था समता सैनिक दलाने केलेली होती. समता सैनिक दलाच्या महिला आणि पुरुष स्वयंसेवकांनी ही जबाबदारी लिलया सांभाळली म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर दीक्षा घेत असतांना व दीक्षा देत असतांना टाचणी पडली तरी आवाज येईल इतकी शांतता होती आणि याचे सारे श्रेय समता सैनिक दलाला आणि त्यांचे स्वयंसेवकांना आहे. त्यामुळेच दीक्षा समारोह सुरू असतांना महिलांच्या विभागात साप निघाला तरी महिलांमध्ये वा लोकांमध्ये गोंधळ न उडता पुढील कार्यक्रम शांततेने पार पडला.[27]

चंद्रपूरच्या दीक्षाविधी कार्यक्रमातही समता सैनिक दलाने फार महत्तपूर्ण योगदान दिलेले आहे. चंद्रपूरला जशीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची खाजगी मोटारकार सरकारी सर्किट हाऊसच्या स्वागतगेटवर आली. डॉ. आंबेडकर मोटारीतून खाली उतरले व समता सैनिक दलाची सलामी स्विकारण्यासाठी उभे होताच पुंडलिक बालाजी देव यांनी आदेश देताक्षणी राजाराम नारायण रामटेके यांनी बिगूल वाजवून सहाशे समता सैनिक दलाच्या तुकडीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समता सैनिक दलातर्फे लष्करी सलामी दिली. या धम्मदीक्षा कार्यक्रमाकरिता चोख व्यवस्था केलेली होती. या भव्यदिव्य धम्मदीक्षा सोहळ्यात एकही खाकी वर्दीवाला नव्हता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी समता सैनिक दलाकडे होती. धम्मदीक्षा विधीला उपस्थित प्रचंड असा 3–4 लाखांचा जनसमुदाय असतांना कोणताच अनुचित प्रकार घडला नाही. सायंकाळी 7:00 वाजता दीक्षा विधीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आले तेव्हा त्यांचे सभोवती व स्टेजसभोवतीही समता सैनिक दल संरक्षणाचे कडे करून उभे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यावेळी कोणतेही भाषण केले नाही. हा संपूर्ण समारंभ समता सैनिक दलाचें संरक्षणाखाली अगदी चोखपणे पार पडला.[28]

एकंदरीत, विचार करता प्रत्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या दोन्ही दीक्षा समारंभासाठी समता सैनिक दलाने जीवाचे रान करीत कार्य केले. धम्मदीक्षा समारंभाच्या कार्याचा प्रचार व प्रसार केला. जागेच्या स्वच्छतेपासून तर लोकांच्या आरोग्यापर्यंत काळजी घेतली. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसह सर्व समाजाचीच सुरक्षा व्यवस्था सांभाळली. समता सैनिक दलाच्या सहकार्याशिवाय एवढी मोठी धम्मक्रांती शक्य झाली नसती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शव दर्शनासाठी बाहेर ठेवण्यात आले. लोकांना व्यवस्थित रांगेने सोडल्या जाऊ लागले. त्यानंतर त्यांचा पार्थिव देह विमानाने मुंबईला न्यायचे ठरले. मुंबईमध्येही प्रचंड जनसमुदाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पार्थिव देहाची वाट पहात थांबलेला होता. येथेही लोकांना सांभाळण्याचे महत्त्वपूर्ण कार्य समता सैनिक दलाने केले. तेथून ते पार्थिव दादरला त्यांचे निवासस्थानी 'राजगृह' येथे नेण्यात आले. परंतु अवघ्या वीस मिनिटांच्या या रस्त्याला अडीच–पाऊणे तीन तास लागले. यावरून या रस्त्यावरील एवढ्या रात्रौलाही असणाऱ्या लोकसमुहाचा अंदाज येतो. समता सैनिक दलाचे सैनिक रस्त्याच्या दोन्हीबाजुच्या लोकांना बाजूला करून शिस्तीत उभे करीत होते. ॲम्बुलन्स 'राजगृहापाशी' येताच लोकांनी इतकी गर्दी केली की, पाच–सात मिनिटे पोलिसांना व समता सैनिक दलाच्या सैनिकांना ती गर्दी आवरणे अशक्य झाले. नंतर हळूहळू ती काबूत आणण्यास ते यशस्वी झाले. 7 डिसेंबरला दुपारी 1 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अंत्यविधीच्या महायात्रेला सुरुवात झाली. यात सुमारे 10 लाख जनता सामिल झाली होती. अंत्ययात्रेची ही मिरवणूक तीन मैल लांबीची होती. परंतु कोठेही गडगड–गोंधळ झालेला दिसत नाही, याचे श्रेय निश्चितच समता सैनिक दलाला आहे. सायंकाळी 7 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ते पार्थिव शरीर चंदनाच्या चितेवर ठेवले. त्यानंतर श्रद्धांजलीचा कार्यक्रम झाला. यावेळी लक्षावधी जनसमुहाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पार्थिव शरीरास साक्षी ठेवून भिख्खू डॉ. भदन्त आनंद कौशल्यायन यांचेकडून बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यानंतर बौद्ध विधीनुसार अग्निसंस्कार करण्यात आले. अशाप्रकारे समता सैनिक दलाने आपले कर्तव्य आणि जबाबदारी चोखपणे बजावली.

### *समारोप :–*

समता सैनिक दलाने आंबेडकरी चळवळीच्या यशस्वितेसाठी आपल्या कर्तव्यात कोणतीही कसूर न करता जमेल तेवढे समाजाला जागृत करण्याचे, त्यांना व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही संरक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे. समता सैनिक दलाच्या 1926–27 च्या स्थापनेपासून तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणापर्यंत विविध आंदोलने करून वा आंदोलनात सहभाग घेऊन आंबेडकरी चळवळ यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केलेले होते.

1927 मध्ये झालेल्या महाड येथील मार्च आणि डिसेंबर अशा दोन्ही सत्याग्रहांमध्ये दलाच्या हजारो स्वयंसेवकांनी महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. पुणे येथील पर्वती मंदिर सत्याग्रह, त्यानंतर नाशिक येथील श्री. काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह प्रदीर्घ काळ चाललेला असतांना समता सैनिक दलाचे कार्यकर्ते वा स्वयंसेवक यांनी या सत्याग्रहामध्ये आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली दिसून येते. सायमन कमिशनच्या काळात सर्व देश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विरोधात असतांना समता सैनिक दलाचे स्वयंसेवक मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संरक्षण आणि समर्थनासाठी झटत होते. 'गांधी–आंबेडकर' यांचे संघर्षाचे काळात गोलमेज परिषदेतील वृत्तांत लोकांपर्यंत पोहचविणे, जनता वृत्तपत्राचे वाटप आणि वाचन करून दाखविणे, अशावेळी 'डॉ. आंबेडकर हेच आमचे नेते आहेत,' अशा अर्थाच्या शेकडो तारा इंग्लंडमध्ये पाठविणे, इत्यादी कार्ये समता सैनिक दलाने केलेले होते. अस्पृश्यांना मिळालेल्या स्वतंत्र मतदार संघाचे विरोधात म. गांधी यांनी उपोषण सुरू करताच, डॉ. आंबेडकरांना मारण्याच्या धमक्या येत असतांना डॉ. आंबेडकरांना, त्यांच्या परिवाराला व समाजालाही संरक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य समता सैनिक दलाने पार पाडलेले होते. 1937 च्या प्रांतीय निवडणुकीमध्ये मुंबई आणि मध्य–वऱ्हाड प्रांतात स्वतंत्र मजूर पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार करून त्यांना संरक्षण देत, बहुमताने निवडून आणण्यात समता सैनिक दलाचा फार मोठा वाटा आहे. नागपूर येथील 1942 चे व 1944 च्या कानपूर येथील अधिवेशनाला यशस्वी करीत समता सैनिक दलाच्या ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांनी समता सैनिक दलाचे संविधान लिहिण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. 1946 च्या निवडणुकांमध्ये शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या उमेदवारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचे कार्यही समता सैनिक दलाने केलेले दिसून येते. 1947 ला भारत स्वतंत्र झाला आणि काही महिन्यामध्येच म. गांधी यांची हत्या झाली. तेव्हा या हत्याकांडाशी काहीही संबंध नसतांना समता सैनिक दलावर बंदी घातल्या गेली. तेव्हा समता सैनिक दल थोडे सैरभैर झाले. परंतु ही बंदी उठताच ते फिनिक्स पक्षाप्रमाणे पुन्हा एकदा झेप घेत नव्या दमाने कार्याला लागले. 1951 च्या निवडणुकांमध्ये शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या उमेदवारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचे कार्यही समता सैनिक दलाने केलेले दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करताच समता सैनिक दल डॉ. आंबेडकरांचा आदेश शीरसावंद्य मानित या कार्याला लागले. धर्मांतराचा हा सोहळा नागपूरमध्ये व चंद्रपूरमध्ये 1956 ला पार पडला, यासाठी त्याचा प्रचार–प्रसार करीत हा सोहळा यशस्वी करण्यासाठी समता सैनिक दलाने जीवाचे रान केले होते.

याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेची चळवळ सुरू करताच लोकांच्या जुन्या रूढी, परंपरा, अंधश्रद्धा दूर करणे, मेलेली जनावरे

Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

ओढणे, कातडी सोलणे व मेलेल्या जनावरांचे मांस खाणे बंद करणे, अस्पृश्यता दर्शक कपडे लावण्याची पद्धती बंद करणे, जमिनी कसण्यास प्रवृत्त करणे, जे स्वयंसेवक तुरुंगात गेलेत त्यांच्या परिवारास संरक्षण देणे, मुलांना शिकविण्यास प्रेरित करणे, त्यांना वसतिगृहात टाकणे, महार वतन बिलास पाठिंबा, खोती पद्धतीविरुद्ध संघर्ष इत्यादी कामे दलाच्या स्वयंसेवकांनी स्वयंप्रेरणेने केलेली होती. याशिवाय स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये कामगारांचा भव्य मोर्चा काढला तेव्हा त्यांनाही दलाचे स्वयंसेवकांनी सहकार्य केलेले होते. अशा एक ना अनेक आंदोलनामध्ये दलाच्या स्थापनेपासून तर 1956 च्या महापरिनिर्वाणापर्यंत समता सैनिक दलाने आपली भूमिका सक्रीयतेने निभावत अविरतपणे कार्य केले.

### *संदर्भ ग्रंथ सूची :–*


1.मून, वसंत (संपा.), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाशणे', खंड–18, भाग–2, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महा. शासन, मुंबई, 2002, पृ. 442.

2.खैरमोडे, चां. भ., 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर,' खंड 3, सुगावा प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती–डिसें. 1990, पृ. 123.

3.कित्ता, पृ. 123.

4.'प्रबुद्ध भारतः रिपब्लिकन पार्टी स्थापना विशेशांक,' संपादक– बी. सी. कांबळे, ता. 1 आक्टोबर 1957, पृ. 19.

5.गजभिए, संजय, 'समता सैनिक दल : इतिहास और संघर्श', सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, प्रथमावृत्ती–2008, पृ. 68.

6.बाली. एल. आर., 'डॉ. आंबेडकरः जीवन और मिशन,' भीम पत्रिका पब्लिकेशन, जालंधर, भाारत, संशोधित आवृत्ती– 2012, पृ. 65.

7.'समता सैनिक दलाची घटना', प्रकाशक– ऑल इंडिया समता सैनिक दल, परेल बॉम्बे, 12, प्रथमावृत्ती– 1946.

8.प्रदीप, गायकवाड (संपा.), 'समता सैनिक दलः काल, आज आणि उद्या,' समता प्रकाशन, लश्करीबाग, नागपूर, प्रथमावृत्ती– 2013, पृ. 2.

9.कित्ता. पृ. 2.

10.कित्ता, पृ. 12.

11.'जनता,' ता. 09 जाने. 1932, वर्ष 2 रे, अंक 9 वा, पृ. 7,8.

12.कीर, धनंजय, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पाप्युलर प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती–2010, पृ. 220.

13.'जनता,' ता. 26 डिसेंबर, 1931, वर्ष 2 रे, अंक 8 वा, पृ. 7, 8.

14.'जनता,' ता. 31 आक्टोबर, 1931, वर्ष 2 रे, अंक 1 ला, पृ. 6,8.

15.खैरमोडे, चां. भ., 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर,' खंड–7 वा, सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती– 1998, पृ. 10.

16.मून, वसंत (संपा.), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे', खंड–18, भाग–2,, पृ. 21.

17.'कित्ता.' पृ. 26.

18.कोसारे, एच. एल., 'विदर्भाती दलित चळवळीचा इतिहास,' नेहा प्रकाशन नागपूर, द्वितीयावृत्ती–2012, पृ. 450.

19.मून, वसंत (संपा.), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाशणे,' खंड 18, भाग–2, पृ. 443.

20.कित्ता, पृ. 447.

21.कित्ता, पृ. 489.

22.मून, वसंत (संपा.), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाशणे,' खंड 18, भाग–3, पृ. 23.

23.पवार, उर्मिला व मिनाक्षी मून, 'आम्हीही इतिहास घडवला,' सुगावा प्रकाषन पुणे, द्वितीयावृत्ती, 8 मार्च 2000, पृ. 82.

24.खैरमोडे, चां. भ., 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर,' खंड 9, सुगावा प्रकाषन पुणे, द्वितीयावृत्ती, पृ. 95.

25.गजभिये, संजय, 'ऑल इंडिया समता सैनिक दलः परिचय, उद्देश्य और कार्यक्रम,' प्रकाशक– ऑल इंडिया समता सैनिक दल प्रकाशन, उंटखाना, नागपूर, प्रथम आवृत्ती– 4 मे 2008, पृ. 13.

26.डोंगरे, डॉ. कृष्णकांत, 'आंबेडकरी चळवळीत नागपूर षहराचे योगदान,' पृ. 325.

27.गोडबोले, वामनराव, 'बोधिसत्त्व डॉ. आंबेडकरांच्या धम्मदीक्षेचा अविस्मरणीय इतिहास,' पृ. 114.

28.भडके, डॉ. इसादास, 'लेणीः समता पर्व विषेशांक, चंद्रपूर–2013,' पृ. 7.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org